# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

-------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## गुरुवार, दिनांक ०३ जुलै, २०२५ / आषाढ १२, १९४७ ( शके )

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

-------------------------------------

### राज्य थॅलेसेमियामुक्त करण्याच्या दृष्टीने मानक कार्यप्रणाली तयार करणेबाबत

**(१) * ७७१८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थॅलेसेमिया सारख्या गंभीर अनुवंशिक आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भावी पिढ्यांना त्यापासून वाचवणे तसेच विविध साथीचे आजार कायम मुक्त करण्यासाठी आरोग्य विभागातंर्गत एक मानक कार्यप्रणाली (एसओपी) तयार करावी तसेच राज्यातील हिवताप विभागाचा आकृतीबंध हा लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ठरविण्यात यावा असे मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सूचित केले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थॅलेसेमिया प्रतिबंध व वेळेवर निदान होण्यासाठी खासगी रूग्णालय आणि दवाखान्यांमध्ये अनिवार्य चाचण्या आणि उपचारांसाठी मदत म्हणून मार्गदर्शक तत्त्वे यांचा या कार्यप्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागाच्या माहितीनुसार राज्यात सुमारे १२,००० थॅलेसेमियाचे रुग्ण असून या कार्यप्रणालीच्या अंमलबजावणीमुळे रुग्णांना चांगले उपचार मिळतील शिवाय नवीन पिढी या आजारापासून वाचू शकेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्य थॅलेसेमियामुक्त करण्याच्यादृष्टीने मानक कार्यप्रणाली तयार करणे तसेच या आजाराचे निदान व्यवस्थापन आणि समुपदेशन यासाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे .
(२) हे खरे नाही.

थॅलेसेमिया प्रतिबंध व वेळेवर निदान होण्यासाठी खासगी रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये अनिवार्य चाचण्या आणि उपचारांसाठी मदत म्हणून मार्गदर्शक तत्वे यांचा या कार्यप्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही. परंतू थॅलेसेमियाच्या आजाराच्या अनुषंगाने जिल्हा शासकीय रुग्णालयात थॅलेसेमिया रुग्णांची प्राधान्याने आवश्यकता विचारात घेऊन एमआरआय स्कॅन, सोनोग्राफी, २ डी इको, नियमित रक्त तपासणी चाचणी, सीबीसी, एलएफटी, केएफटी, सिरम फेरिटिन, टीएफटी तपासण्या करण्यात येतात. थॅलेसेमिया आजाराचे निश्चित निदान हे एचपीएलसी तपासणी द्वारे करण्यात येते व ही तपासणी सर्व आरोग्य संस्थामध्ये मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

थॅलेसेमियाच्या रुग्णांना आवश्यकतेनुसार मोफत रक्त संक्रमण करण्यात येते. शरीरातील लोह कमी करण्यासाठीच्या Iron chelation च्या गोळया देण्यात येतात.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आलेली असून त्याअंतर्गत राज्य आरोग्य संस्था (PHI) नागपूर येथे प्रशिक्षण (TOT) घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तेथे प्रशिक्षकांमार्फत जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण/कार्यशाळा घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना कळविण्यात आलेले असून समुपदेशकांना थॅलेसेमिया आजारासंदर्भात राज्य आरोग्य संस्था, नागपूर (PHI Nagpur) मार्फत प्रशिक्षण घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्य आरोग्य संस्था (PHI) नागपूर यांचेकडून सद्यस्थितीत ARSH,Sickle Cell, RBSK व ICTC या योजनांतर्गत कार्यरत असलेल्या ३४ जिल्ह्यांमधील १०० समुपदेशकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅन खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२) * ७३०७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने कॅन्सर निदान करण्यासाठी आठ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन बाजारभावापेक्षा दुप्पट-तिप्पट दराने खरेदी केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्हॅनची मूळ किंमत, त्यावर करण्यात आलेले फॅब्रिकेशन, कॅन्सर डायग्नोस्टीक उपकरणे असे मिळून एका व्हॅनचा खर्च सुमारे ४५ ते ५० लाख रूपये अपेक्षित असताना पुरवठादार कंपनीबरोबर संगनमत करून वाहने खरेदी करताना सर्व नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर खरेदीमुळे शासनाची सुमारे आठ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रान्वये मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुरवठादार कंपनी व संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

आठ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन ची खरेदी ही GeM पोर्टलवर Turn Key पध्दतीने करण्यात आलेली असून, स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त दर हे अंदाजित दरापेक्षा ०.९४ टक्के ने कमी आहेत.
(२) हे खरे नाही.

आठ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन ची खरेदी ही GeM पोर्टलवर स्पर्धात्मक पध्दतीने करण्यात आलेली असून बस चासिस, ४४ नग वैद्यकीय उपकरणे, फर्निचर व कस्टमायझेशन यांचा समावेश आहे. सदर खरेदी ही शासनाचे सर्व प्रचलित नियमांचे पालन करुन करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना सखोल चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

**ठाणे जिल्हयातील शासकीय रुग्णालयात महत्वाचे साहित्य व औषध खरेदीमध्ये झालेला अपहार**

**(३) * ७२५३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शासकीय रुग्णालयात महत्वाचे साहित्य व औषध खरेदीमध्ये सुमारे रु.५० कोटी इतक्या रकमेचा अपहार झाला असल्याचे दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(४) * ९८१० श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.निलेश राणे (कुडाळ), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये वैद्यकीय उपकरणे खरेदी प्रकरणांमध्ये शेकडो कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वसामान्य गोरगरिब रुग्णांना मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधांच्या नावाखाली बाजारभावापेक्षा अधिक दराने आवश्यकता नसतांना विभागाकडून वैद्यकीय उपकरणांची खरेदी करण्यात येत असल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरज असलेल्या उपकरणांच्या प्रस्तावांची छाननी करून त्याला तांत्रिक मंजुरी देण्यात येऊन संबंधित प्रस्ताव वित्त विभागाने निधीच्या उपलब्धतेसह प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर संबंधित विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया राबवून टेंडर पद्धतीने कामास मंजूरी देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विशिष्ट वैद्यकीय उपकरणांच्या उद्योगातील कंपन्यांशी संपर्क साधून त्यांचे दर ठरवून आर्थिक हितसंबंध जोपासणाऱ्या कंपनीला सदर कंत्राट देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी कंपन्या व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांकरीता यंत्रसामुग्रीची खरेदी उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन विहित पद्धतीने करण्यात येते.

(२) नाही.

विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांना आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर प्रशासकीय मान्यतेनंतर विहित पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविण्यात येते व निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या निविदाकारांपैकी न्युनत्तम (L1) देकार प्राप्त निविदाकारास पुरवठा आदेश प्रदान करण्यात येतो.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : विअप्र-२०१३/ प्र.क्र. ३०/ १३/ विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग-२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येतात.

(४) नाही.

संबंधित यंत्रसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांचे अवलंब करुन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन महा ई-टेंडर या प्रणालीवर निविदा प्रसिद्ध करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील सुरक्षा रक्षक कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देणेबाबत

**(५) * ७४०१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहर परिसरात असलेल्या अनेक खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी सुरक्षा रक्षक कामगारांची आर्थिक पिळवणूक व मानसिक अत्याचार करीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी पोलीस उपायुक्त, डोंबिवली यांचेकडे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सुरक्षा रक्षकांना त्यांचे योग्य हक्क मिळवून देणेबाबत व संबंधित दोषी खाजगी सुरक्षा एजन्सीवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१),(२) व (३) या प्रकरणी श्री. सदानंद थरवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे यांनी दि.१३.०५.२०२५ रोजी पोलीस उप आयुक्त,कल्याण परिमंडळ -३ यांचेकडे पत्र दिलेले आहे.

त्या अनुषंगाने पोलीसांमार्फत चौकशी करण्यात आली असुन सदर परिमंडळातील सर्व पोलीस ठाण्यांना सुरक्षा रक्षकांसंदर्भात आलेल्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन सुरक्षा रक्षकांना योग्य तो न्याय द्यावा असे संबंधित पोलीस उप आयुक्तांनी आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या अंतर्गत, तसेच इतर कामगार कायद्यातील तरतूदीनुसार सुरक्षा रक्षकांना असणारे सर्व लाभ सदर आस्थापनांनी सुरक्षा रक्षकांना अदा करणे बंधनकारक आहे. त्यास अनुसरुन सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना नोंदीत मुख्य मालकांकडे मंडळामार्फत वितरीत करण्यात येते. त्यांना विविध कामगार कायद्याअंतर्गतचे सर्व लाभ देण्यात येतात. मंडळातील नोंदीत व अनोंदीत आस्थापनांची तसेच खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सींची मंडळामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येत असून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत निरीक्षण शेरे पारित करण्यात येतात. सदरहू निरीक्षण शेऱ्यांची पुर्तता होण्याच्या अनुषंगाने मंडळाद्वारे नियंत्रण ठेवण्यात येते.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ अंतर्गत ज्या आस्थापना मंडळात नोंदीत नाहीत व सूट घेतलेली नाही अशा आस्थापना शोधण्यासाठी मंडळामार्फत वेळोवेळी शोध मोहीम राबविण्यात येते. ज्या आस्थापना नोंदीत नाहीत त्यांच्यावर मंडळामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

कल्याण-डोबिंवली (जि. ठाणे) शहर परिसरामध्ये सन २०२२ मध्ये ७०, सन २०२३ मध्ये ८०, सन २०२४ मध्ये ५९ व माहे मे २०२५ पर्यंत ६ इतके निरीक्षण शेरे पारित केले आहेत. तसेच ६ आस्थापनांवर प्रथम वर्ग प्रथम न्यायालय, ठाणे येथे खटले दाखल करण्यात आले आहेत व पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) निरंक.

-----------------

**पालघर जिल्हयातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(६) * ७३८९ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सफाळे येथील ३० खाटांचे सुसज्ज ग्रामीण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र श्रेणीवर्धन अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असूनही अद्याप पर्यंत जिल्हा प्रशासन व जिल्हा आरोग्य विभागामार्फत भूसंपादन होत नसणे, वाडा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला असूनही या रुग्णालयाच्या विस्तार करण्यासाठी पुरेशी जागा नसणे, तसेच परळी (ता.वाडा) प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करणे. तीन वर्षांपासून प्रलंबित असणे, विरार येथील ग्रामीण रुग्णालयाची दुरवस्था झाली असणे यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार तसेच आरोग्य विषयक मुलभूत सोयी-सुविधा मिळत नसल्याने परिणामी बरेचदा रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मोखडा तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्र, १६ उपकेंद्र आणि भरारी पथके असून येथे फक्त प्राथमिक उपचार होण्याइतकीच आरोग्य विषयक साधन सामुग्री असल्याने बऱ्याचवेळा रुग्णांना ग्रामीण रुग्णालयात जावे लागते तसेच प्रसूतीसाठी स्त्रीयांना जव्हार आणि नाशिक येथे लांबचा प्रवास करुन जावे लागत असल्याने या रुग्णालयात कायमस्वरूपी बालरोग तज्ञ, भूलतज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांची गरज असतानाही दुर्गम भागात राहण्याची सोय नाही अशी कारणे देऊन अनेक वैद्यकीय अधिकारी या भागात येण्याचे टाळतात अथवा बदली करीत असल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने बालमृत्यू आणि मातामृत्यू चे प्रमाण आटोक्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंजाड (ता.डहाणू) येथील श्रीमती सायनू जितेश सावर वय -२३ वर्ष या आदिवासी गर्भवती महिलेला आयसीयूमध्ये उपचाराची गरज असूनही सदर सेवा उपलब्ध नसल्याने तिला उपचारासाठी गुजरातला नेताना तिचा व तिच्या बाळाचा प्रवासात मृत्यू झाला असल्याचे दिनांक ३ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पालघर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासंदर्भातील प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करणे तसेच रिक्त पदे भरणे व आरोग्य विषयक मुलभूत सोयी-सुविधा जिल्हयातील सर्व रुग्णालयात उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, सफाळेचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०४.०८.२०२३ अन्वये श्रेणीवर्धन करण्यांत आले आहे.

सद्य:स्थितीत, प्राथमिक आरोग्य केंद्र, परळी व सफाळे कार्यान्वित असल्याने रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय वाडा व विरार येथे दाखल होणाऱ्या रुग्णांना सर्व मुलभूत आरोग्य सेवा पुरविल्या जातात. आरोग्य विषयक मुलभूत सोयी-सुविधा अभावी रुग्णांचा मृत्यू झालेला नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

मोखाडा तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्र, १६ उपकेंद्र आणि भरारी पथके असून येथे रुग्णांना प्राथमिक उपचार करुन ग्रामीण रुग्णालय, मोखाडा अथवा उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे आवश्यकतेनुसार रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी संदर्भीत केले जाते.

तसेच, सदर रुग्णालयात दाखल होणा-या गंभीर, अतिगंभीर व अत्यावस्थ असलेल्या रुग्णांना पुढील तृतीय स्तरावरील अत्यावश्यक सेवांची आवश्यकता भासल्या नजिकच्या शासकीय रुग्णालयांमध्ये संदर्भीत करण्यांत येते. उपजिल्हा रुग्णालय, जव्हार व डहाणू या दोन्ही रुग्णालयांमध्ये स्त्रीरोगतज्ञ सेवा तसेच उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे बालरोगतज्ञ यांच्या सेवा उपलब्ध आहेत.

(३) हे अंशतः खरे आहे.

गंजाड (ता. डहाणू) येथील श्रीम. सायनू जितेश सावर वय-२५ वर्ष या गर्भवती महिलेस दि.२७/०४/२०२५ रोजी दुपारी १२.४५ वाजता डहाणू उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले. तपासणी अंती सदर मातेचे बाळ रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीच पोटातच दगावले असल्याचे निदर्शनास आले. सदर प्रसुती पालघर आयपीएचएस स्त्रीरोग तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर मातेस Abruptio Placenta मुळे प्रसुतीनंतर जास्त रक्तस्त्राव झाल्याने आवश्यक ते सर्व औषधोपचार करण्यात आले. सदर रुग्णाची गंभीर परिस्थिती तसेच आयसीयू सेवांची निकड लक्षात घेता १०८ रुग्णवाहिकेद्वारे शासकीय रुग्णालय, वलसाड येथे संदर्भीत करण्यात आले. सदर रुग्णाची स्थिती गंभीर असल्याने रुग्णवाहिकेतच मृत पावली.

(४) श्रेणीवर्धीत करण्यांत आलेल्या मोखाडा, विक्रमगड, सामान्य रुग्णालय, मनोर व ट्रामा केअर युनिट,मनोर व डहाणू करीता शासन निर्णय दिनांक १३.२.२०२५ अन्वये पदे निर्माण करण्यात आलेले आहेत. तसेच नवघर (वसई), वाडा व तलासरी येथे १०० खाटांचे उप जिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. सफाळे, परळी व खोडाळा येथील प्रथामिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले आहे.

जिल्हा रुग्णालय, पालघर अधिनस्त कार्यरत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आवश्यकतेनुसार वैद्यकीय साधनसामुग्री, उपकरणे व औषधसाठा याचा वापर करुन सर्व रुग्णांना आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करुन दिल्या जातात.

नियमित वर्ग-१ ते वर्ग-२ ची पदे पदोन्नती / प्रतिनियुक्तीने तसेच नामनिर्देशनाने भरली जातात. काही ठिकाणी वर्ग-२ गट-अ संवर्गातली पदे रिक्त असली तरी, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येतात. वर्ग-३ ची नियमित पदे तसेच काल्पनिक कुशल व अकुशल पदे उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांचे स्तारावरुन भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. वर्ग ४ संवर्गातील काल्पनिक कुशल व अकुशल पदे बाहय यंत्रणेमार्फत भरण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पालघर यांचे स्तरावरुन सुरु आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियामधून आयपीएचएसद्वारे विशेषज्ञ सेवा ऑनकॉल / कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करुन घेण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन

त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत. तथापि, चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी नवीन बांधकामे करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत ज्या ठिकाणी नवीन आरोग्य संस्थांची निर्मिती करणे आवश्यक आहे त्यासंबंधातील माहिती घेऊन आराखडा तयार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मानखुर्द येथील बालसुधारगृहातील मुलांच्या सुरक्षिततेबाबत करावयाची उपाययोजना**

**(७)** * **८९६८ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मानखुर्द येथील बालसुधारगृहातील मुलांना खेळण्यासाठी सोडले असता सायंकाळी ६:०० वाजता मुलांची हजेरी घेतली असता तीन मुले गायब असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गायब झालेल्या तीन मुलांपैकी दोन मुले रात्री उशिरा बालसुधारगृहात परत आली असून १२ वर्षाचा एक मुलगा अद्यापही बेपत्ता असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सदर बालसुधारगृहातील बेपत्ता बालकाचा शोध घेणे तसेच तेथील बालकांची सुरक्षा याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.१४ एप्रिल, २०२५ रोजी संस्थेतून एक प्रवेशित गायब असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही.

दि.१४ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६:३० वाजता एक प्रवेशित संस्थेतून गायब असल्याचे निदर्शनास आले होते. परंतु दि.१५ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ६:०० वाजता सदर प्रवेशित संस्थेत परत आला आहे.

(३) दि.१४ एप्रिल, २०२५ रोजीच्या घटनेच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करुन संबंधित एका कर्मचाऱ्यास दि.१७.एप्रिल, २०२५ रोजी कर्तव्यावरुन कमी करण्यात आले. अशा स्वरुपाच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सदर मुलाचे समुपदेशन करण्यात आले आहे. तसेच संस्थेमध्ये बालस्नेही वातावरण निर्माण व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून सर्व प्रवेशितांचे समुपदेशन करण्यात आले आहे. संस्थेच्या अवारात सी.सी.टि.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना उदा.मार्गदर्शक, गृहपाल, रक्षक यांना मुले संस्थेतून न सांगता निघून जाणार नाहीत याबाबतची काळजी घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयाच्या परिसरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करणेबाबत**

**(८) * ८६२९ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील वाढत्या रुग्णसंख्येमुळे तेथील परिसरात सुरु असलेले १२०० खाटांचे नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम अतिशय संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम सन २०१९ मध्ये सुरु झालेले असून अद्यापपर्यंत एकाही विंगचे काम पूर्ण झालेले नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामाच्या कंत्राटदाराने खोदकामात मोठ्या दगडांची अडचण आणि कोरोना महामारी ही कारणे देत काम पूर्ण करण्यासाठी एक वर्षाची मुदत वाढवून घेतली तरीही अद्याप काम प्रलंबित असूनही याबाबत शासनाने कंत्राटदारावर कोणतीही दंडात्मक कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर बांधकामाचा खर्च सन २०२० मध्ये रु.४०७.१६ कोटी असताना सदर खर्च वाढून रु.७७८.७५ कोटी पर्यंत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकामास होणाऱ्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह इमारतीचे बांधकाम जलदगतीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयाचे भाग A व भाग B आरसीसी काम, वरची लिफ्ट मशीन रुम व बाह्य विकासाचे काम प्रगतीत असून सदर आवारात जे.जे. रुग्णालय कार्यरत असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही.

(३) होय.

सदर रुग्णालय इमारतीचे बांधकाम विहित वेळेत पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) नाही.

(५) काम विहित वेळेत पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासोबत समन्वय साधून कामे तातडीने पूर्ण करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा करणेबाबत

**(९) * ७०८९ श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमोल खताळ (संगमनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (वैजापूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण), श्री.राजेश वानखडे (तिवसा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाने सुरु केलेल्या जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत ५० हजार मंजूर योजनेच्या कामांपैकी केवळ २३ हजार योजनांची कामे पूर्ण झाली असणे, अद्यापी २६ योजनांची कामे विविध कारणांमुळे अपूर्णावस्थेत असल्याने अनेक गावे नळपाणी योजना व पाण्यापासून वंचित राहिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: कोल्हापूर, अहिल्यानगर जिल्हयात अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे, जालना जिल्हयातील कामांमध्ये अनियमितता व वेळेत कामे पूर्ण न करणे, निकृष्ट मालाचा वापर, पुणे येथील नळपाणी पुरवठा योजनेच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार, सांगली जिल्हयात अत्यंत अल्प निधी तसेच निधी अभावी योजनेची कामे प्रलंबित असणे, परभणी जिल्हयातील कामांना मंजूरी देऊनही कामे अपूर्ण स्थितीत असणे, सिंधूदुर्ग जिल्हयात कामे प्रलंबित ठेवून ठेकेदार गायब असणे, धुळे, पालघर, लातूर जिल्हयात "हर घर नल से जल" या योजनेची कामे अत्यंत संथ गतीने सुरु असणे, तसेच अनेक ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याची कामे

अपूर्ण स्थितीत असणे, कंत्राटदारांना वेळेवर देयके न मिळणे, नागपूर येथे जलजीवन मिशन अंतर्गत नवीन विहिरीवर वीजजोडणी देण्याकरिता डी.पी.डी.सी. अंतर्गत निधीमंजूर असणे, निधीअभावी विंधन विहीर, पंपगृह, ऊर्ध्वनलिकेवरील कामे तसेच विद्युत पंप, सौरऊर्जा पंप, वितरण व्यवस्था आदी कामे अपूर्ण असणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, चंद्रपूर, रत्नागिरी, रायगड, ठाणे, अकोला, हिंगोली, यवतमाळ, बीड, नंदूरबार, भंडारा, गडचिरोली, सातारा, गोंदिया, नाशिक, धाराशिव, बुलढाणा, सोलापूर इ. अनेक ठिकाणी जलजीवन योजना फक्त कागदोपत्रीच असणे, प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळणे, अनेक ठिकाणी योजनेत लागू असणाऱ्या लोकवर्गणीचा भार राज्य शासनामार्फत देणे प्रस्तावित असणे, एकाच कंत्राटदाराला अनेक गावांची कामे देणे, इ.अनेक कारणास्तव राज्यात सर्वत्र या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही तसेच जलवाहिन्या टाकण्याचे काम अपूर्ण स्थितीत असणे, कंत्राटदारांना वेळेवर देयेक मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे तक्रारी, निवेदने व मंत्रिस्तरावर बैठका घेऊनही त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन या योजनांची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करणे तसेच, यातील दोषी कंत्राटदार व कर्मचारी/अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) नाही, हे खरे नाही,

जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत एकूण ५१,५५८ योजना मंजूर असून त्यापैकी एकूण २५,५४९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत व उर्वरित २६००९ योजना विविध टप्यावर प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील योजनेमध्ये अस्तित्वातील पाण्याच्या स्त्रोतांमधून पाणी पुरवठा सुरू असुन, ज्या ठिकाणी उपलब्ध स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा नियमीत होत नाही त्या ठिकाणी टंचाई कालावधीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

(२) नाही, हे खरे नाही.

कोल्हापूर, अहिल्यानगर, जालना, पुणे येथील तसेच अन्य सर्व जिल्ह्याकरीता सर्व योजनांच्या कामांची देखरेख विभागातील अभियंत्यांमार्फत व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेमार्फत नियमितपणे करण्यात येते तसेच झालेल्या कामांची शासनाने नियुक्त केलेल्या त्रयस्थ तपासणी यंत्रणा (TPI) कडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते. त्रयस्थ तपासणी यंत्रणा यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. ज्या ठिकाणी मानकांनुसार कामे झालेली नाहीत तिथे कंत्राटदारांच्या खर्चातून सदर कामे मानकाप्रमाणे पुर्ण करण्यात येतात व त्यानंतर संबंधितांना कामाच्या प्रगतीनुसार देयके प्रदान करण्यात येतात. कोल्हापूर, अहिल्यानगर, जालना व सिंधुदुर्ग वेळेत कामे पुर्ण न करणाऱ्या व कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यात आलेली आहे. सांगली, परभणी, धुळे, पालघर, लातूर, नागपूर जल जीवन मिशन मधील कामांची गती ही जागेची उपलब्धता, स्थानिकांचा विरोध, विविध विभागांच्या परवानग्या, कंत्राटदारांकडून होणारी दिरंगाई, उद्भवातील वर्तविलेला अंदाज चुकणे (Source Fail) व अपुरा निधी या कारणांमुळे मंदावलेली आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यात ५१५५८ एवढ्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील प्रत्येक योजनेला स्वतंत्र सांकेतांक देण्यात आला असून प्रत्यक्षात झालेल्या कामांच्या

प्रगतीनुसार भारत सरकारच्या IMIS प्रणालीवर सर्व योजनांची आर्थिक व भौतिक प्रगतीसह योजनेची सर्व माहिती अद्ययावत करण्यात येते. तसेच राज्यातील सुमारे ७०९८ योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत योजनांची तांत्रिक छाननी सुरू आहे. रू.५ कोटी पेक्षा कमी रकमेची कामे जिल्हा परिषदेकडून व त्यापेक्षा जास्त रकमेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याद्वारे ऑनलाईन निविदा प्रक्रीया राबवुन नियमानुसार कामांची कंत्राटे प्रदान करण्यात आलेली आहेत. योजनांची कामे उपांगनिहाय वेगवेगळया टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत. तसेच माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्रशासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसून, जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून राज्य शासनातर्फे विशेष बाब म्हणून रू.२४८३.५८ कोटी इतका निधी सन २०२४-२५ मध्ये वितरीत करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) नाही, हे खरे नाही, वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारी, निवेदने व बैठकांची योग्य दखल घेतली जाते.

(५) जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांच्या बाबतीत ठेकेदारांकडून कामात दिरंगाई झाल्यास निविदा शर्तीनुसार प्रथमत: दंडात्मक कारवाई केली जाते व तरीही सुधारणा न झाल्यास ठेकेदारास काळया यादीत टाकले जाते. योजनांची कामे पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. अंदाजपत्रकांची तांत्रिक छाननी केल्यानतंर जरुरी भासल्यास कर्मचारी/अधिकाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## बीड येथे जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी विकास कामांमध्ये केलेली अनियमितता

**(१०) * १०८९३ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथे जिल्हा जलसंधारण अधिकारी या पदावर कार्यरत प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी विविध विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामे निकृष्ट दर्जाची झालेली असतानाही या विषयाची चुकीची माहिती पुरवत सर्व कामे पुर्ववत असल्याचे भासवून शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या अनियमिततेबाबत स्थानिक नागरिकांनी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड विधानसभा क्षेत्रातील सन २०१९ ते मे, २०२५ या कालावधी दरम्यान झालेल्या निविदेची व त्या निविदेवरील कामाची गुण नियंत्रण विभागाच्यावतीने तपासणी करण्यात यावी तसेच सदरील प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या अनियमिततेची व गैरव्यहाराची चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची सखोल चौकशी करुन निकृष्ट कामास जबाबदार कंत्राटदार तसेच संबंधित प्रभारी कार्यकारी अभियंता व जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) स्थानिक नागरीकांनी लोकप्रतिधींकडे तक्रारी केल्याचे स्थानिक लोकप्रतिनीधींच्या पत्रात नमूद केले आहे.
(४) व (५) हे अंशत: खरे आहे,

बीड जिल्ह्यातील बीड व शिरूर का. या तालुक्यातील जलसंधारणच्या कामांच्या संदर्भात मा. वि. स. स. श्री. संदीप क्षीरसागर यांनी शासनास तसेच मृद व जलसंधारण विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयास तक्रारी केल्या आहेत. प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर तक्रार अर्जातील १०८ कामांची तपासणी करून चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. तसेच, सदर तक्रारींच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात १४ कामांची तपासणी करुन चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर दोन्ही अहवालांमध्ये तक्रारीतील कामे समाधानकारक असल्याचे अभिप्राय नोंदविण्यात आले आहेत.
(६) विलंब झाला नाही.

-----------------

**राज्य मराठी विकास संस्थेने विश्व मराठी संमेलनासाठी केलेल्या खर्चाचा तपशिलवार हिशोब देणेबाबत**

**(११)** * **७५४७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मराठी विकास संस्थेने तीन विश्व मराठी संमेलनासाठी केलेल्या कोट्यवधीं रुपयांचा खर्चाचा तपशीलवार हिशोब देण्यास टाळाटाळ केल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तीनही विश्व मराठी संमेलनासाठी तज्ञ समिती नेमली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विशिष्ट कंपन्या वगळता राज्याच्या विविध विभागातील कोणालाही या आयोजनामध्ये सामावून घेतले नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही. सन २०२३, २०२४ व २०२५ या वर्षी झालेल्या तीनही विश्व मराठी संमेलनांच्या संबंधात माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अर्जदारानी मागितलेली व राज्य मराठी विकास संस्थेच्या अभिलेखांत उपलब्ध असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली आहे.
(२) तीनही विश्व मराठी संमेलनांचे आयोजन मराठी भाषा विभाग व विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांच्या समन्वयाने करण्यात आले आहे.तसेच, विश्व मराठी संमेलन आयोजित करण्याबाबत व त्यासाठीच्या खर्चाबाबत राज्य मराठी विकास संस्थेच्या प्रकल्प वित्त समितीची व कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली आहे.

(३) तीनही विश्व मराठी संमेलनांच्या आयोजनासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ई-निविदा पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवून कंपनीची निवड करण्यात आली आहे.
(४) विहित कार्यपद्धतीनुसार तीनही संमेलनांचे आयोजन झालेले असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(१२) * ७५६८ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात सोलार प्रकल्प, व्यसनमुक्ती केंद्र, पुनर्वसन केंद्र, सफाई व्यवस्था, कपडे खरेदी, रुग्ण आहार व्यवस्था व किरकोळ साहित्य खरेदी इत्यादी विविध कामांमध्ये सुमारे रु.१.२४ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आरोग्य विभागाने नेमलेल्या पाच सदस्यीय चौकशी समितीने त्यांच्या अहवालात नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर प्रकरणात सरकारी निधीचा अपहार, वित्तीय अधिकारांच्या मर्यादांचे उल्लंघन, नियमबाह्य देयक अदा, करारनाम्यांतील अटींकडे दुर्लक्ष व सफाई सेवा पुरवठादारांना किमान वेतन व भविष्य निर्वाह निधीची खातरजमा न करता देयके अदा करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनील पाटील यांच्यासह सन २०१७ पासून कार्यरत इतर प्रशासकीय अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक व लिपिक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून नुकसानभरपाईची रक्कम वसूल करण्याची शिफारस आरोग्य संचालकांकडे केली असून संबधित दोषींवर विभागीय चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव पुणे विभाग, उपसंचालक यांच्याकडून आरोग्यसेवा आयुक्तांकडे मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात झालेल्या आर्थिक गैरव्यवहास जबाबदार असलेले संबधितावर कारवाई करणेसह भविष्यात वित्तिय अनियमितता घडू नयेत याकरीता प्रतिबंधात्मक यंत्रणा लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या प्राथमिक चौकशी अहवालाच्या अनुषंगाने विभागीय चौकशीचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून मागविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत वैद्यकीय अधीक्षकांचा कार्यभार उपअधीक्षकांना देण्यात आला आहे आणि मनोरुग्णालयाची देयके ही उपसंचालक यांच्या स्तरावरुन तपासणी करुन अदा करण्याबाबत वैद्यकीय अधीक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे यांना सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील गावांमध्ये उद्योगांकडून होणारे प्रदूषण आणि नैसर्गिक कारणांमुळे जलस्त्रोत दूषित होत असल्याबाबत

**(१३) * १०९४१ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील तब्बल ५९८ गावांमध्ये उद्योगांकडून होणारे प्रदूषण आणि नैसर्गिक कारणांमुळे जलस्त्रोत दूषित होत असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमधील पाणी मानवी आरोग्यास हानिकारक असल्याची नोंद सर्वेक्षण अहवालात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी लोहखनिज बाधित ६ आणि जीवाणू बाधित ३१६ नमूने आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त गावांतील जलस्त्रोत शुध्दीकरण करणे, नागरीकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबत तसेच यास जबाबदार उद्योग व्यवस्थापनांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ या वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे मार्फत रासायनिक दृष्ट्या ४५४४ व जैविकदृष्ट्या ७७१३ पाणी नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये रासायनिक घटकांनी प्रदूषित असलेले ११७ व जैविक घटकांनी प्रदूषित असलेले १८२ नमुने आढळून आले आहेत.

(२) हे खरे आहे.

तथापि,बाधित स्त्रोतातील पाणी पिण्यास वापरण्यास बंद करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील तपासण्यात आलेल्या एकूण ७७१३ जैविकदृष्ट्या पाणी नमुन्यांपैकी १८२ जैविक पाणी नमुने बाधित आढळून आलेले आहेत. लोहखनिज बाधित स्त्रोत आढळून आले नाही.

(४) जैविक घटकांनी प्रदूषित असलेल्या १८२ स्त्रोतांचे क्लोरीनेशन करून पुर्नतपासणी करण्यात आली असता सर्व १८२ नमुने योग्य असल्याचे आढळून आले आहे.

रासायनिक घटकांनी प्रदूषित असलेले ११७ स्त्रोतामधील पाणी पिण्यास बंद करण्यात आले असून, सदर बाधित गावांना अन्य स्त्रोताव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

रासायनिक घटकांनी बाधित ११७ नमुने असलेल्या ६४ गावे तसेच १८२ जैविक बाधित नमुने असलेल्या ७३ गावे अशा एकूण १३७ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कायम स्वरुपी पिण्याच्या पाण्याच्या योजना घेण्यात आल्या असून या योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.

उद्योगांकडून होणारे प्रदूषण या कारणामुळे जलस्त्रोत दूषित होत असल्याची कोणतीही तक्रार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे तसेच जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेली नाही. तथापि औद्योगिक प्रदूषण म्हणजेच काही उद्योगांमधून नदीमध्ये सोडण्यात येणारे सांडपाण्यामुळे राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत बाधित होत असल्याचे दिसून आले असल्याने याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने उद्योग विभागास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस ( एमईएमएस ) अंतर्गत रुग्णवाहिका खरेदी निविदेप्रक्रियेत झालेली अनियमितता

**(१४) * १०७६९ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस (एमईएमएस) अंतर्गत आरोग्य विभागाने १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविण्याच्या योजनेंतर्गत नवीन निविदा प्रक्रिया राबवून १७५६ रुग्णवाहिकांसाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड, सुमीत फॅसिलिटीज लिमिटेड या मर्जीतल्या कंपनीसोबत सुमारे रु. १११० कोटी रुपयांचा १० वर्षासाठी करार करुन रुग्णवाहिकांसाठी रु. २४० कोटी रुपयांचा दर ठरविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णवाहिकांची खरेदी आणि त्या चालविण्यासाठी सध्याच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे रु.३२५ कोटी वर्षाला खर्च येत असतांना अतिरिक्त रु.४०० कोटी इतका खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दरामध्ये तब्बल ३६० टक्के वाढ करण्यात आल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णवाहिकांचा पुरवठा आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने निविदा दस्तऐवज तयार करण्यासाठी बीव्हीजी इंडिया ही कंपनी शासनास सल्लागार तसेच कर्मचारी पुरवठा करण्याचे काम करत असून सुध्दा रुग्णवाहिका पुरवठयाची निविदा याच कंपनीला देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

ई-निविदा प्रक्रीयेद्वारे न्यूनतम दराने निवडण्यात आलेल्या निविदाधारकांच्या संयुक्त भागीदारी (Consortium) समवेत १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविण्यासबंधित सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ९३७ रुग्णवाहिका उपलब्ध असून केंद्र शासनाच्या लोकसंख्येच्या निकषानुसार २५५ ॲडव्हान्स लाईफ सर्पोटींग रुग्णवाहिका (ALS),१२७४ बेसिक लाईफ सर्पोटींग रुग्णवाहिका (BLS), ३६ नवजात अर्भक रुग्णवाहिका, १५ नदी बोट रुग्णवाहिका, १० समुद्र बोट रुग्णवाहिका, १६६ मोटारबाईक रुग्णवाहिका अशा एकूण १७५६ रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येणार आहेत. यास्तव रुग्णवाहिकांचा खर्च वाढीव दिसून येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

शासन निर्णय दि.२१ जून २०२३ अन्वये मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद सेवा योजनेकरिता सेवापुरवठादाराची निवड करण्याकरिता निविदा समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदरील समितीच्या मान्यतेनुसार निविदा दस्तऐवज तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार निविदेमध्ये सहभाग घेतलेल्या व पात्र ठरलेल्या ०३ भागीदारांच्या Consortium ला (मे.सुमित फॅसिलिटीज लि., मे.बी.व्ही.जी इंडिया लि. व मे.एस.एस.जी ट्रान्सपोरटे सॅनिटेरियो एस.एल) कार्यादेश देण्यात आलेले आहे.

(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सदरील निविदेबाबत जनहित याचिका (६२ /२०२४) दाखल करण्यात आली होती. मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. ०८.०४.२०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदरील जनहित याचिका फेटाळण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खवसा वाडी (ता.पेण, जि.रायगड) तसेच इतर आदिवासी पाड्यात आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१५) * १२३७० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खवसा वाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी वाडीतील एका महिलेचा उपचाराविना मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, रायगड यांनी या आदिवासी वाडीला भेट दिली असता या आदिवासी पाड्यासह तेथील १५० आदिवासी पाड्यात कोणत्याच प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांतील रस्ते, आरोग्य व इतर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) आदिवासी पाडयातील नागरिकांना आवश्यक आरोग्य विषयक सेवा नियमित दिल्या जातात.

प्रधानमंत्री जनमन योजना अंतर्गत जिल्ह्यात एकूण १२,२०० एवढी घरकुल मंजूर असून त्यापैकी २११० घरकुलांची कामे पूर्ण झालेली आहेत. इतर घरकुल बांधकाम पूर्ण करुन घेण्यात येत आहेत.

प्रधानमंत्री जनमन योजनेअंतर्गत एकूण ५५ अंगणवाडी केंद्र मंजूर असून त्यापैकी ३७ कामे प्रगतीत असून ४ कामे पूर्ण झाली आहेत. प्रधानमंत्री जनमन योजना अंतर्गत ६ ठिकाणी निवासी वसतीगृह मंजूर आहेत. त्यामधील २ कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामिण विकास संस्था, रायगड, अलिबाग यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक १६/६/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार खवसा, उंबरवाडी, तांबडी रस्ता ता.पेण हे काम मंजूर करण्यात आलेले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत पेण तालुक्यातील मौजे खवसावाडी येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून, सदर योजनेव्दारे खवसा वाडीत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. पेण तालुक्यात आदिवासी भागात एकूण २४ गावे व ९० वाड्या आहेत. सदर गावे/वाड्यांकरीता जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर २४ योजनांपैकी १३ योजनांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित ११ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. कामे पूर्ण झालेल्या योजनांमधून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यात आदिवासी भागात एकूण १३४ गावे व २९९ वाड्या मोडतात. सदर गावे/ वाड्यांकरिता जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर १३४ योजनांपैकी ४६ योजनांची कामे पूर्ण झाली असून, सदर योजनांमधून पाणी पुरवठा करण्यात आला आहे, तर उर्वरित ८८ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील योजनांची कामे माहे डिसेंबर, २०२६ पूर्वी करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यास होत असलेला विलंब**

**(१६) * ७१६० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी रु.८ कोटी ८१ लाख ३५ हजार ६३१ इतक्या रकमेची ई-निविदा प्रसिद्ध होऊन बराच कालावधी होऊन सुद्धा अद्यापही धरणातील गाळ काढण्यासाठी विलंब होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाचा गाळ काढल्यास जवळपास ४६ गावे व ३३ आदिवासी वाडयांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे धरणातील गाळ काढण्यासाठी तीन वेळा निविदा व सूचना प्रसिद्ध करूनही धरणाचा गाळ काढण्यास विलंब होत असल्यामुळे गावांना व आदिवासी वाडयांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ४६ गावे व ३३ आदिवासी वाडयांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी उमटे धरणातील गाळ काढण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर कामासाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. सदर कामाकरीता पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

उमटे धरण हे उमटे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता. अलिबाग, जि. रायगड योजनेचा उद्भव आहे. उमटे धरणातील गाळ काढल्यानंतर उमटे धरणाची पाणी साठवण क्षमता वाढणार आहे. त्यामुळे योजनेतील समाविष्ट गांवे/ वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

(३) सदर कामाची निविदा तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली होती, त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. पुन्हा चौथ्यांदा निविदा प्रसिध्द करून निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू आहे. उमटे धरणातून सदर गावांना व वाड्यांना पाण्याचा पुरवठा सुरू आहे.
(४) उमटे धरणाच्या गाळ काढण्याच्या कामांकरीता चौथ्या वेळी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयात कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये वित्त आयोगाच्या निधीचा होत असलेला गैरवापर

**(१७) * ८७४६ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयात कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींना योग्य सुविधा व प्रशिक्षण न पुरविता पंधराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर आणि अनियमितता झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये वित्त आयोगाकडून प्राप्त निधी, खर्च झालेला निधी, खर्चाचा तपशिल, प्रशिक्षणावर झालेला खर्च, ग्रामीण भागातील महिलांना देण्यात आलेले प्रशिक्षण, एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या व त्यांना देण्यात आलेल्या प्रशिक्षणांचे प्रकार इत्यादीबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर केंद्रामध्ये सातत्याने गैरव्यवहार घडत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त असतानाही अद्याप या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन गरजू प्रशिक्षणार्थींना योग्य सुविधा व प्रशिक्षण देणे तसेच यातील संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) हे खरे नाही,
कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींना योग्य सुविधा व प्रशिक्षण न पुरविता पंधराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीचा गैरवापर आणि अनियमितता झाल्याचे चौकशी अहवालानुसार निदर्शनास आले नाही.
(२) गटविकास अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही, वर्तमानपत्रातील तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे.
(४) चौकशीअंती अनियमितता सिध्द न झाल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(१८) * ७१७३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान रु.१५०० ऐवजी रु.२१०० देता येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या योजनेकरीता वित्त विभागाने सामाजिक न्याय विभागाचे सुमारे तीन हजार कोटी रुपये व आदिवासी विकास विभागाचे सुमारे चार हजार कोटी रुपये तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाचे रु.४१०.३० कोटीचा निधी वर्ग केला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी अर्ज करण्याची शेवटच्या मुदतीनंतर ज्या महिलांच्या वयाची २१ वर्षे पूर्ण झाली त्या पात्र ठरत असून व ज्यांचे अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद ठरले त्यांनाही पुन्हा अर्ज करावयाचे असतांनाही अद्यापपर्यंत नव्याने अर्ज नोंदणी सुरु करण्यात आलेली नाही तसेच अपात्र अर्जांची पडताळणी केल्यानंतर संख्या कमी होण्याऐवजी माहे जानेवारीच्या तुलनेत माहे फेब्रुवारी आणि मार्च मध्ये संख्या वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील महिला सदस्य अपात्र असतानाही अडीच हजाराहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेंतर्गत मिळणारे अनुदान थेट लाभ हस्तांतर (डीबीटी) द्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात आयसीआयसीआय बँकेमार्फत झालेल्या संबंधित माहिती उपलब्ध करुन देणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, महिला व बालविकास यांना दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, लाभार्थी बहिणींना उद्योग सुरू करावयास भांडवल नसेल त्यांना या योजनेच्या हमीवर लघु उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करून कर्जाचा हप्ता या योजनेतून शासनातर्फे भरण्याची योजना विचारधीन असल्याची माहिती मा. वित्तमंत्री यांनी दिली असल्याने किती रुपयांची रक्कम कर्जाऊ दिली जाणार व यासाठी व्याजदर किती आकारण्यात येणार आहे,

(७) असल्यास, उक्त बाबीची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलेला दरमहा रु.१५००/- इतका आर्थिक लाभ देण्याची तरतूद आहे.

(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना आर्थिक लाभ अदा करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातंर्गत सर्वसाधारण घटकांसाठी रु.२८२९०.०० कोटी, आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी घटकांसाठी रु.३२४०.०० कोटी व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील घटकांसाठी रु.३९६०.०० कोटी रुपये इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार उपलब्ध करुन दिलेला निधी पात्र लाभार्थी महिलांना आर्थिक लाभ अदा करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत २,२८९ राज्य सरकारी कर्मचारी महिलांनी योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचा लाभ बंद करण्यात आलेला आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) व (७) सदरची बाब सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.

-----------------

## धाराशिव (जि.धाराशिव) येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांचे मानधन, पदव्युत्तर व आंतरवासियता विद्यार्थी यांचे प्रलंबित विद्यावेतन अदा करणेबाबत

**(१९) * १२०७९ श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांचे मानधन, पदव्युत्तर व आंतरवासियता विद्यार्थी यांचे मागील सहा महिन्यांचे विद्यावेतन अद्यापपर्यंत अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील फक्त धाराशिव जिल्ह्यातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांचे मानधन, पदव्युत्तर विद्यार्थी, आंतरवासियता विद्यार्थी यांचे विद्यावेतन अदा करणे वारंवार प्रलंबित रहात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महाविद्यालयातील मागील सहा महिन्यांचे विद्यावेतन अदा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांचे मानधन, पदव्युत्तर विद्यार्थी, आंतरवासियता विद्यार्थी यांचे मागील सहा महिन्यांचे विद्यावेतन अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२), (३) व (४) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिव येथील कंत्राटी अध्यापक व कर्मचारी यांच्या मानधनाकरिता पुर्नविनियोजनाव्दारे माहे मार्च, २०२५ मध्ये अनुदान उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली होती. तथापि, बीम्स प्रणालीवरील तांत्रिक अडचणीमुळे अनुदान वितरित करणे शक्य

झाले नव्हते. आता वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यावेतन व कंत्राटी वेतन अदा करण्यांसाठी अनुदान उपलब्ध असून, कंत्राटी अध्यापक व कर्मचारी यांचे माहे मे, २०२५ व पदव्युत्तर व आंतरवासीय विद्यार्थ्यांचे माहे मार्च, २०२५ अखेरपर्यंतचे मानधन/ विद्यावेतन अदा करण्यात आले आहे. पदव्युत्तर व आंतरवासीय विद्यार्थ्यांचे माहे एप्रिल, २०२५ अखेरपर्यंतचे विद्यावेतनाचे देयक कोषागार कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही महाविद्यालयाच्या स्तरावरून सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करणेबाबत**

**(२०) * ७२२७ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात सुमारे ३४,५०० आरोग्य कर्मचारी कार्यरत असून त्यांना माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२५ या दोन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे डॉक्टर, नर्सेस, आरोग्यसेविका, डेटा एन्ट्री ऑपरेटर्स, पर्यवेक्षक, समुपदेशक, प्रशासनिक अधिकारी आदींच्या कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीतून केंद्राच्या हिश्श्याचे रुपये ८०० कोटी प्रलंबित असल्यामुळे शासनाला कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करता आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रलंबित वेतन तातडीने एकत्रित देण्यात यावे अशी विनंती कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे थकित वेतन एकत्रिक अदा करणेसह पुढील वेतन नियमित होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात सद्य:स्थितीत ४८,९२७ इतके कंत्राटी स्वरुपातील कर्मचारी कार्यरत आहेत. केंद्र शासनाकडून माहे जानेवारी, २०२५ पासून निधी प्राप्त न झाल्याने मानधन प्रलंबित राहिले होते. सध्या केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असून माहे मे, २०२५ अखेर पर्यंतचे मानधन अदा करण्यासाठी दि.२४.०६.२०२५ रोजी जिल्हयांना निधी वितरीत केलेला आहे. सदर वितरीत निधीमधुन मानधन अदा करावयाची कार्यवाही चालू आहे.

(२) केंद्र शासनाकडून प्राप्त निधी मानधन अदा करण्यात आले नव्हते मात्र, सद्य:स्थितीत जिल्हयांना निधी वितरीत केला असून सदर निधीतून मानधन अदा करावयाची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे.
(३) केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्याने माहे जानेवारी, २०२५ पासून मानधन प्रलंबित राहिले होते. परंतु, माहे मार्च, २०२५ अखेरपर्यंत मानधन अदा केले आहे. तसेच, केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर माहे एप्रिल व मे, २०२५ अखेर पर्यंतचे मानधन अदा करण्यासाठी दि.२४.०६.२०२५ रोजी जिल्हयांना निधी वितरीत केलेला आहे. सदर वितरीत निधीमधुन मानधन अदा करावयाची कार्यवाही सुरू आहे.
(४) जिल्हयांस निधी वितरीत केला असून सदर निधीमधुन मानधन अदा करावयाची कार्यवाही सुरू आहे.
(५) केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होताच जिल्हयांस निधी वितरित करण्यात आला आहे व मानधन अदा करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील मंद्रूप येथील सीतामाई तलावाची दुरुस्ती करणेबाबत**

**(२१) * ९७५५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील (जि.सोलापूर) मंद्रूप येथील सीतामाई तलावाची दुरुस्ती करत असतानाच तलावातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती झाल्याने लाखो लिटर पाणी शेतात गेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंद्रूप येथील सीतामाई तलावाचे आयुष्यमान संपल्याने बांधाला भेगा पडत असल्याने या तलावाची पुनर्बांधणी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन त्याअनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणे, पाण्याची गळती रोखणे तसेच तलावाची पुर्नबांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.
सदर तलावाची दुरुस्ती करण्यासाठी Outlet Pipe काढणे गरजेचे असल्याने पाणी खालील बाजूस नाल्यामध्ये सोडण्यात आले होते. तरी त्यामुळे कोणत्याही शेतक-याचे नुकसान झालेले नाही
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर तलावाची पुनर्बांधणीचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच कोणत्याही शेतक-याचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सर्पदंश झालेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळणेबाबत**

**(२२) * ७१३१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव (ता.खेड, जि.पुणे) या गावातील १७ वर्षीय कु.प्रांजल तुकाराम गोपाळे या महाविद्यालयीन युवतीस सर्पदंश झाल्यावर तिला तातडीने वैद्यकीय उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याचे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच चांडोली, राजगुरूनगर येथील ग्रामीण रुग्णालयात व याच ठिकाणी असलेले ट्रॉमा केंद्र बंद असल्याने सदर युवतीस वेळेवर उपचार झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील आरोग्य यंत्रणा आपत्तीकाळामध्ये सक्षम नसून तालुक्यातील डेहणे आदिवासी भागात ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय जागा उपलब्ध होत नसल्याने व चाकण येथे १०० खाटांचे महिला रुग्णालयास अंतिम मंजुरी मिळत नसल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना वारंवार घडत असून देखील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वेळेवर उपचार न मिळण्याची कारणे काय आहेत ,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सर्पदंशाने होणारे मृत्यू रोखणे, मृतांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देणे व तातडीने उपचार मिळणेबाबत तसेच डेहणे आणि चाकण येथील प्रस्तावित रुग्णालयांना तात्काळ मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) कु. प्रांजल तुकाराम गोपाळे, वय १७ वर्षे रा. आडगाव ता. खेड, जि.पुणे या युवतीस शुक्रवार दिनांक १६.०५.२०२५ रोजी सकाळी ०९.०० च्या सुमारास मौजे आडगाव, ता. खेड, जि.पुणे या ठिकाणी सर्पदंश झाला होता. तिच्या नातेवाईकांनी तिला खाजगी वाहनाने सकाळी १०:३० वाजता ग्रामीण रुग्णालय चांडोली ता. खेड, जि. पुणे या रुग्णालयात दाखल केले होते. तेथे, आपत्कालीन विभागामध्ये रुग्णावर तात्काळ प्रथम उपचार सुरु करण्यात आले व सर्पदंशावरील लस Inj. Asv हे IV NS सलाईनमधून देण्यात आले व Inj. Dexa.२cc, Inj. Pan या प्रकारची इंजेक्शन देण्यात आली. पुढील तातडीच्या उपचाराकरीता ICU ची आवश्यकता असल्याने १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहीकेने डॉ. यशवंतराव चव्हाण रुग्णालय, पिंपरी, पुणे येथे संदर्भित करण्यात आले होते. परंतु, पुढील उपचाराकरीता घेऊन जात असतानाच रुग्णाची शारीरीक परिस्थिती खालावल्याने मोजे चिखली या ठिकाणी रूग्णाचा रुग्णवाहिकेमध्येच मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर सर्पदंशाचा रुग्ण ग्रामीण रुग्णालय, चांडोली येथे दाखल झाला होता. तेथे रुग्णाला दाखल करताच पुढील आवश्यक असणारे सर्व उपचार तात्काळ देण्यात आलेले आहेत. ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिट चांडोली, ता. खेड, जि. पुणे हे रुग्णालय २४X७ तास चालू असते.

(३) हे खरे नाही.

खेड तालुक्यात १) ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर, चांडोली, जि.पुणे २) ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धीत झालेले उपजिल्हा रुग्णालय, चाकण, ३) ग्रामीण रुग्णालय, आळंदी हया आरोग्य संस्था असून सदर आरोग्य संस्थेत येणाऱ्या रुग्णांवर २४x७ तास तपासणी व उपचार करण्यात येतात.

खेड तालुक्यातील डेहणे या आदिवासी भागामध्ये ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाची मागणी नाही.

(४) व (५) ग्रामीण भागात सर्पदंशावरील उपचारासाठी सर्व प्रा.आ.केंद्रांमध्ये सर्पदंशावरील लस (Inj. ASV) उपलब्ध असते. त्यामुळे, सर्पदंशाचा रूग्ण प्रा.आ.केंद्रात उपचाराकरिता आल्यावर त्याच्यावर तात्काळ उपचार करण्यात येतात व सर्पदंश झालेल्या रुग्णांचा मृत्यू होणार नाही याची काळजी घेतली जाते. रुग्णाचे व्हायटल्स मॉनिटर केले जातात व आवश्यकतेनुसार रुग्णास पुढील उपचाराकरीता संदर्भित केले जाते. सर्पदंशाने होणाऱ्या मृत्यूच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देणेबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

तसेच, चाकण येथील प्रस्तावित नवीन रुग्णालयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत. तथापि, चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी नवीन बांधकामे करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत ज्या ठिकाणी नवीन आरोग्य संस्थांची निर्मिती करणे आवश्यक आहे त्यासंबंधातील माहिती घेऊन आराखडा तयार करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर,धेंरड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सिनारमस कंपनीच्या काढण्यात आलेल्या बेकायदा निविदेबाबत

**(२३)** * **८२१७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर,धेंरड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सिनारमस कंपनीच्या महाकाय कागद प्रकल्पासाठी लागणारे भूसंपादन पूर्ण होण्याआधीच शासनाने सदरहू कंपनीसाठी पाण्याची पाईपलाइन टाकण्यासाठी निविदा काढल्याने या विरोधात सदर भागातील शेतकऱ्यांनी दिनांक १५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील कुर्डस, कसुंबळे, श्रीगाव या ग्रामपंचायत हद्दीतील २८ गावांना फिल्टर्ड पाण्याची पाईपलाईन देण्यासाठी ग्रामस्थांनी गत दहा वर्षांपासून वारंवार निवेदने तसेच प्रत्यक्ष भेटून विनंती करुनही शासनाने त्याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दहा वर्षांपासूनची २८ गावांची पाण्याची पाईपलाइन मंजूर न करता परस्पर सिनारमस कंपनीची पाणी पुरवठ्याच्या प्रस्तावास मंजुरी देऊन निविदा काढण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कंपनीसाठी काढण्यात आलेल्या बेकायदा निविदा प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच २८ गावांची पाण्याची पाईपलाईन प्रस्तावास तात्काळ मंजूरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१), हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यामधील शहापूर व धेरंड या गावांच्या हद्दीमध्ये मऔवि महामंडळाने ३८७.७५ हेक्टर क्षेत्र संपादित करुन सदरील क्षेत्र मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना औष्णिक उर्जा प्रकल्पा करिता दि. २४/११/२०१४ रोजी ताब्यात दिले होते. में. टाटा पॉवर कंपनी लि. यांना काही कारणास्तव उद्योग उभारणी शक्य न झाल्यामुळे त्यांनी सदरील क्षेत्र दि.२२/०७/२०२० रोजी मऔवि महामंडळाला परत केले होते. सदर क्षेत्रातील २८७.७५ हेक्टर क्षेत्र मे. एपीपी सिनारमस यांना पत्र क्र. डी- ९२८४७ दि. २८/११/२०२२ नुसार वाटप करण्यात आले व १०० हेक्टर क्षेत्र मे. नेचर ब्लिस ॲग्रो यांना पत्र क्र. सी -९४९०० दि. ०२/०९/२०२२ नुसार वाटप करण्यात आले.

सदर कंपन्यांना त्यांचे प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक त्या पायाभुत सोयीसुविधा पुरविण्यासाठीच्या कामांच्या निविदांची प्रक्रिया सुरु केलेली आहे. शेतकरी संघटना, खारेपाट विभाग यांनी त्यांचे दि. ०६/०५/२०२५ च्या पत्राद्वारे म.औ.वि. महामंडळास त्यांच्या विविध मागण्यासाठी निवेदन दिले होते. त्या मध्ये त्यांनी त्यांच्या मागण्यांचा सहानुभुतीपुर्वक विचार न केल्यास दि. १५/०५/२०२५ रोजी शेतकरी आक्रोश मोर्चा काढणार असे नमूद केले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि. १४/०५/२०२५ रोजी शेतकरी संघटना, खारेपाट विभाग यांचेशी चर्चा करण्यात आली. त्यांना कुर्कुस, कुसुंबळे, श्रीगाव ग्रामपंचायत हद्दीतील २८ गावांना फिल्टर पाण्याची पाईपलाईन टाकण्याच्या कामाला महामंडळाने प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे पत्र क्र. आय-११२२२६ दि. १४/०५/२०२५ देऊन त्यांना प्रस्तावित शेतकरी आक्रोश मोर्चा रद्द करणे बाबत विनंती करण्यात आली. सदर विनंतीला मान देऊन, शेतकरी संघटना, खारेपाट विभाग यांनी प्रस्तावित मोर्चा रद्द केला.

(२),(३) व (४) हे खरे नाही.

सदर विषयाबाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १०/१०/२०२३ रोजी पत्र दिले होते. सदर पत्रान्वये, कुसुंबळे ग्रामपंचायत हद्दीतील २७ गावांना फिल्टर पाणी मिळावे अशी विनंती केली होती. सदरील गावांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड, पाणी पुरवठा विभाग यांची असल्यामुळे जिल्हा परिषद रायगड यांना पत्र क्र. आय-११२२०३ दि. ०७/०५/२०२५ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि माणुसकीच्या दृष्टीकोनातुन विचार करुन या भागातील कुर्कुस, कुसुंबळे, श्रीगाव या ग्रामपंचायत हद्दीतील २८ गावांकरीता फिल्टर पाण्याची जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी म.औ.वि.महामंडळाने प्रशासकीय मान्यता आदेश क्र.CEO/AA/ ५०४८/ २०२५ Dt. १४/०५/२०२५ द्वारे रु. ४९५.८५ लक्ष (निव्वळ) व रु. ५७०.२३ लक्ष (ठोक) एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील गावांना दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(२४) * ७१७५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या योजनांच्या जलस्रोतांच्या पाणी नमुन्यांची तपासणी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केली असता माहे मार्च, २०२५ पर्यंत ४८८ पाणी नमुने दूषित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या दूषित पाण्यामुळे राजूर (ता.अकोले, जि. अहिल्यानगर) येथे कावीळची साथ पसरून दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू होऊन सुमारे ४०० रुग्ण आढळल्याचे दिनांक ३ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह गावांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय हे खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणा-या योजनांच्या जलस्त्रोतांच्या पाणी

नमुन्यांची तपासणी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केली असून दिनांक ०१.०४.२०२४ ते दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत २०६३८ पाणी नमुने तपासणी करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ४८८ नमुने दूषित असल्याचे आढळून आलेले आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

राजूर ग्रामपंचायत हद्दीत ३७० रुग्ण आढळून आलेले असून २ मृत्यु झाल्याचे आढळून आलेले आहे.दिनांक ०१.०६.२०२५ रोजी पासून नवीन रुग्ण आढळून आलेले नाहीत. तसेच सद्यस्थितीत साथ नियंत्रणात आलेली आहे.

(३) सदर प्रकरणी आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, अकोले यांना निलंबित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत जल जीवन मिशन अंतर्गत रेट्रो राजूर नळ पाणी पुरवठा योजना नुतनीकरणाचे काम प्रगती पथावर आहे. आज रोजी जुन्या अस्तित्वातील योजनेतून ग्रामपंचायत मार्फत शुध्द पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२५) * ७१८५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय जनजागृती अभियान, सुकन्या योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ अशा उपक्रमांनंतरही मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागातील जालना, परभणी, हिंगोली, नांदेड येथील मुलींच्या जन्मदरात घट होऊन सन २०२४-२५ मध्ये जन्मलेल्या प्रत्येक १००० मुलांमागे केवळ ८०४ मुलींचा जन्म झाल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणात असमतोल वाढण्याची शक्यता असून त्याचे दीर्घकालीन परिणाम सामाजिक असंतुलन, बालविवाह, महिला अत्याचार व मानवी तस्करीसारख्या गंभीर समस्यांच्या स्वरूपात होण्याची भीती आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर विभागातील मुलींच्या जन्मदरात वाढ व्हावी, लोकांमध्ये मानसिक बदल घडवावा, स्त्री भ्रूणहत्येचा निर्बंध काटेकोरपणे लागू करणे, बालविवाह रोखणे, बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे तसेच सर्व संबंधित विभागांनी एकत्रित कृती घडवून आणावी यासाठी आरोग्य, महिला व बालकल्याण, ग्रामविकास व सामाजिक न्याय विभागाच्या समन्वयातून संभाजीनगर विभागासाठी विशेष जनजागृती मोहिम सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुलींच्या जन्मदरात वाढ व्हावी, बालविवाह रोखणे तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे यासाठी राबवलेल्या योजनांचे मूल्यमापन करून त्यात सुधारणा करुन गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याच्या कडक अंमलबजावणीबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे : (१)** हे खरे नाही.

(२), (३) व (४) मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलींच्या मृत्यू दर कमी करणे व बाल विवाह रोखणे, कुपोषण कमी करणे इ. करीता लेक लाडकी, बेटी बचाव बेटी पढाव, प्रधानमंत्री मातृवंदना योजना व बाल विवाह प्रतिबंध अधिनियम इ. अंतर्गत उपयोजना राबविण्यात येत आहेत.

सदर योजनेंतर्गत मुलींचा जन्मदर वाढविण्याच्या दृष्टिकोनातून व बाल विवाह रोखण्यासाठी जनजागरण मोहिम राबविण्यात येते.

राज्यात मुलींच्या जन्मदर वाढावा यासाठी प्रसूतीपूर्व व गर्भलिंग निदान कायदा (PCPNDT) या कायद्यातंर्गत पथकामार्फत कारवाई करण्यात येते. तसेच सदर कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे:-

१. राज्यामध्ये पीसीपीएनडीटी टोल फ्री हेल्प लाईन क्र. १८००-२३३-४४७५/१०४ असून, राज्यातील कोणतीही व्यक्ती या अधिनियमाचे उल्लंघन होत असल्याबाबत तक्रार नोंदवू शकतो.

२. खबरी बक्षीस योजनेंतर्गत पीसीपीएनडीटी व एमटीपी या अधिनियमांचे उल्लंघन होत असल्याची खबर देण्याऱ्या व्यक्तीस जर खबर खरी असेल तर रु.१.०० लक्ष इतके बक्षीस देण्यात येते.

३. सोनोग्राफी व तत्सम केंद्रांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतनीकरण करण्यासाठी संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून प्रत्येक सोनोग्राफी मशीनला मशीन नोंदणी क्रमांक देण्यात येतो.

४. तपासणी करण्यात येणाऱ्या रुगांची नोंदणी ऑनलाईन करण्यात येते.

तसेच, बालमृत्यू रोखण्याकरिता नवजात शिशू काळजी कक्ष, नवजात शिशू स्थिरीकरण, नवजात शिशू कोपरा, कॅाम्प्रिहेन्सिव्ह लॅक्टेशन मॅनेजमेंट सेंटर (सीएलएमसी), बालमृत्यू अन्वेषण, घरच्या घरी नवजात शिशूची काळजी, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, "मा" Mother Absolute Affection (MAA), स्टॉप डायरिया कॅम्पेन, ॲनिमिया मुक्त भारत, नियमित लसीकरण, इत्यादी उपाययोजना करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये बाह्यस्त्रोतामार्फत करण्यात येणाऱ्या कंत्राटी भरती प्रक्रियेमधील गैरव्यवहार

**(२६) * ८८०८ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय संस्था, महामंडळांमध्ये आवश्यक कर्मचाऱ्यांची कामगार विभागाच्या दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सुरु झालेली कंत्राटी भरती विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्षांच्या विरोधानंतर रद्द करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५९ शासकीय वैद्यकीय, आयुर्वेदिक, होमिओपॅथी महाविद्यालये आणि रुग्णालयांकरिता गट-क व गट-ड या संवर्गातील मंजूर ६,८३० पदे बाह्यस्त्रोतामार्फत भरण्यास शासनाने माहे जुलै, २०२४ मध्ये मान्यता दिली असून सदर भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांकडून आर्थिक मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंपन्या उमेदवारांकडून नोकरी नियमित असल्याचे आश्वासन देऊन दीड ते तीन लाख रुपये घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री व शिक्षण आयुक्त यांना संपर्क साधला असता विभागाकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रकरणात मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंपन्याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) नाही.
सदर भरती प्रक्रियेत उमेदवारांकडून आर्थिक मागणी केली जात असल्याबाबत वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीची तात्काळ दखल घेण्यात आली. त्यानुसार संबंधित बाह्यस्त्रोत मनुष्यबळ सेवापुरवठादारांकडून वस्तुस्थिती दर्शवणारी माहिती/अहवाल मागविण्यात आला. प्राप्त अहवालानुसार, उमेदवारांकडून पैसे मागितल्याची किंवा नोकरी नियमित असल्याचे आश्वासन देऊन रक्कम घेतल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, सदर प्रकरणी सेवापुरवठादार विरोधात कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यामुळे सेवापुरवठादारांविरोधात कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यामध्ये अनधिकृत गर्भलिंग निदान व गर्भपात कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(२७) * १२०३७ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यामध्ये अनधिकृत गर्भलिंग निदान व गर्भपात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गर्भलिंग निदान चाचणी व गर्भपात करणे कायदेशीर गुन्हा असतानाही सर्रासपणे चायना बनावटीचे सोनोग्राफी मशिनचे प्रोब वापरून गर्भलिंग निदान करून गर्भपात केला जात असतानाही याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामासाठी अनेक एजंट नेमण्यात आले असून गर्भलिंग निदान करण्यासाठी मोठी रक्कम आकारली जात असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन राज्यात अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासह सर्वत्र गर्भलिंग निदान व अनधिकृत गर्भपात कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत तसेच यातील दोषींविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

राज्यात गर्भलिंग निदान व अनधिकृत गर्भपात कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• राज्यामध्ये पीसीपीएनडीटी टोल फ्री हेल्प लाईन क्र. १८००-२३३-४४७५/१०४ असून, राज्यातील कोणतीही व्यक्ती या अधिनियमाचे उल्लंघन होत असल्याबाबत तक्रार नोंदवू शकतो.

• दि. १५ मार्च, २०२४ पासून **आमची मुलगी** (www.amchimulgimaha.in) हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे.

• **खबरी बक्षीस योजना** - या योजनेंतर्गत पीसीपीएनडीटी व एमटीपी या अधिनियमांचे उल्लंघन होत असल्याची खबर देण्याऱ्या व्यक्तीस जर खबर खरी असेल तर रु. १.०० लक्ष इतके बक्षीस देण्यात येते. तसेच डिकॉय केस मधील महिलांना न्यायालयीन प्रक्रियाकरीता उपस्थित राहण्याकरीता रु. १.०० लक्ष तसेच डॉक्टर फी साक्षीदार, इत्यादी करीता अर्थसहाय्य रु.५०,०००/- देण्यात येते.

• सोनोग्राफी व तत्सम केंद्रांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतनीकरण करण्यासाठी http://pcpndtonlineregistration.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून प्रत्येक सोनोग्राफी मशीनला मशीन नोंदणी क्रमांक देण्यात येतो.

• तपासणी करण्यात येणाऱ्या रुग्णांची नोंदणी ऑनलाईन www.pcpndt.maharashtra.gov.in एफ-फॉर्म मध्ये करण्यात येते.

• न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करण्याकरिता www.mhpcpndtcourtcases.in हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे.

• मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार निबंधक,मा.उच्च न्यायालय,मुंबई व संर्व संबंधितांना पीसीपीएनडीटी अंतर्गत दाखल प्रकरणे जलद रितीने निकाली काढण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे थकीत मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करणेसह प्रलंबित मागण्या मान्य करणेबाबत

**(२८) * ७७४९ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२५ ला दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांना रुपये दोन हजार व मदतनिसांना रुपये एक हजार प्रतिमाह प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेऊनही माहे मार्च/एप्रिल, २०२५ पर्यंत मागील सात महिन्यांचे मानधन अद्याप देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन दरवर्षी माहे मार्च-एप्रिलच्या मानधनाची तरतूद करत नसल्यामुळे दरवर्षी त्यांना माहे मार्च-एप्रिल महिन्याचे मानधन उशीरा दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे मानधन निधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना तसेच इत्यादी लोकप्रिय योजनांकरीता वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची आठ हजार पदे रिक्त असून त्याच्या विविध मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अंगणवाडी सेविका व मतदनिसांचे थकीत मानधन व प्रोत्साहन भत्ता तातडीने अदा करणे, रिक्त पदे भरणे व त्याच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशतः खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये रुपये ३०००/- व अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनामध्ये रुपये २०००/- याप्रमाणे प्रतिमाह वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सुधारित मानधनानुसार माहे ऑक्टोबर, २०२४ पासून प्रतिमाह मानधन अदा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत माहे मे,२०२५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे. तसेच, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रोत्साहन भत्याकरिता विहित केलेल्या निकषांपैकी काही निकषांची माहिती पोषण ट्रॅकर ॲप्लिकेशन मधून उपलब्ध होण्यास अडचणी असल्याने प्रोत्साहन भत्ता अदायगी होऊ शकलेली नाही. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक २४.०६.२०२५ अन्वये प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा या केंद्र पुरस्कृत योजनेमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधनाकरिता केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा व अतिरिक्त राज्य हिश्यामधून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरवातीला निधी उपलब्ध होण्यामध्ये काही अवधी लागत असतो. तथापि, निधी प्राप्त होताच मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार, माहे मार्च, २०२५ चे मानधन दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी व माहे एप्रिल महिन्याचे मानधन दिनांक ६ मे, २०२५ रोजी अदा करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) राज्यातील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची एकूण १७३८२ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता जाहिरात देण्यात आली होती. त्यापैकी एकूण १३७८० अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन नियमितपणे अदा केले जाते. शासन निर्णय दिनांक २४.०६.२०२५ अन्वये प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२९) * ७७२५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके आढळली असून त्यापैकी ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषणाच्या श्रेणीमध्ये असून १ लाख ५१ हजार ६४३ बालके मध्यम कुपोषित श्रेणीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगर जिल्हयात १६ हजार ३४४ , ठाणे शहरात ८६९ तर ग्रामीण भागात ९३ अतितीव्र कुपोषित बालके, नाशिक जिल्ह्यात ९ हजार ८५२, पुणे जिल्ह्यात १ हजार ६६६, धुळे जिल्ह्यात ९ हजार ७४७ , छत्रपती संभाजीनगरमध्ये १ हजार ४३९ बालके तीव्र कुपोषित आढळली असून नागपूर मध्ये १ हजार ३७३ मुले तीव्र कुपोषित असल्याची बाब बालविकास सेवा आयुक्तालयाच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदविण्यात आलेल्या ६१ हजार २२७ कुपोषित बालकांचे वजन करण्यात आलेले नसल्याचे तर पोषण श्रेणीनुसार मुंबई महानगरपालिकेने ६ हजार ९२ बालकांच्या पोषण श्रेणीची नोंदच केली नसल्याचे व सर्वाधिक कुपोषित बालके ही मुंबई उपनगरात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत २० हजार ५९४ पदे रिक्त असून त्यामध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचीही भरती प्रलंबित असल्याने परिणामी कुपोषण मुक्तीसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांसाठी ठोस निर्णय घेण्यासाठी सक्षम अधिकारी नसल्याने योजनेच्या अंमलबाजावणीत अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यात कुपोषण मुक्तीसाठी राबविण्यात येण्या-या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेसह एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत असलेली रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

पोषण ट्रॅकरवरील माहे फेब्रुवारीच्या डेटानुसार राज्याची कुपोषणाची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

| एकूण वजन व उंची घेतलेली बालके | मध्यम कुपोषित बालके (MAM) | % | तीव्र कुपोषित बालके (SAM) | % |
|---|---|---|---|---|
| ४८५९३४६ | १५१६४३ | ३.१६ | ३०८०० | ०.६४ |

(२) हे खरे आहे.

मुंबई उपनगर, ठाणे शहर आणि ग्रामीण, नाशिक, पुणे, धुळे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर जिल्ह्याची पोषण ट्रॅकरवरील माहे ,२०२५ च्या डेटानुसार कुपोषणाची स्थिती खालील प्रमाणे आहे:-

| जिल्हा | एकूण वजन व उंची घेतलेली बालके | मध्यम कुपोषित बालके (MAM) | % | तीव्र कुपोषित बालके (SAM) | % |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई उपनगर | २३४८९६ | १३४५७ | ५.७३ | २८८७ | १.२३ |
| ठाणे | १८५३६० | ७३६६ | ३.९७ | ८४४ | ०.४६ |
| नाशिक | ३०५६२८ | ८९४४ | २.९३ | १८५२ | ०.६१ |
| पुणे | २९८९२९ | ७४१० | २.४८ | १६६६ | ०.५६ |
| धुळे | १४१९०४ | ६३७७ | ४.४९ | १७४१ | १.२३ |
| छत्रपती संभाजीनगर | १८६९५२ | ६४८७ | ३.४७ | १४३९ | ०.७७ |
| नागपूर | १६७६०३ | ६७१५ | ४.०१ | १३७३ | ०.८२ |

(३) अंशत: खरे आहे.

पोषण ट्रॅकरवरील माहितीनुसार राज्यामध्ये एकुण ४८,१४,८१५ लाभार्थी बालकांपैकी ४७,८२,८५९ बालकांची वजन व उंची नोंदविण्यात आलेली आहे. वजन आणि उंचीची नोंद न-घेतलेल्या बालकांची संख्या ३१,९५६ इतकी आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात सॅम (SAM) श्रेणीतील २,८८७ बालके आणि मॅम (MAM) श्रेणीतील १३,४५७ बालके आहेत. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण नोंदणीकृत २,८७,११३ बालकांपैकी, माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये पोषण ट्रॅकर प्रणालीवर २,८३,१३७ बालकांची वजन आणि उंचीची नोंद घेण्यात आली होती. वजन आणि उंचीची नोंद न-घेतलेल्या बालकांची संख्या ३,९७६ इतकी आहे. बालके बाहेर गावी गेल्यामुळे वजन व उंची घेणे शक्य होत नाही.

(४) राज्यात अंगणवाडी सेविका व मदतनीसांची एकूण मंजूर पदे २,२१,३३८ त्यापैकी २,१७,७३६ पदे भरलेली आहेत तर उर्वरित रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्याचप्रमाणे बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्या रिक्त पदांच्या भरतीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

१. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना THR तर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. तसेच, आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून या योजने अंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी तर मांसाहारी बालकांना प्रति दिन १ अंडे देण्यात येते.

३. तसेच, राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम/नागरी बाल विकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम/नागरी बाल विकास केंद्रामध्ये सॅम बालकांना तीन वेळा Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो. तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील ऑक्विला ऑरॉनिक प्रा. लि. कंपनीमध्ये रिॲक्टरचा स्फोट झाल्याबाबत

**(३०) * ७४२१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील औद्योगिक क्षेत्रातील ऑक्विला ऑरॉनिक प्रा. लि. कंपनीमध्ये रिॲक्टरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू तर अनेक कामगार जखमी झाल्याचे दिनांक १८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीत कोणत्याही कायदेशीर व तांत्रिक बाबी पूर्ण न करता ट्रायल घेण्यात आल्याने व निकृष्ट दर्जाची यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आल्याने या दुर्घटनेची तीव्रता अधिक असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण तसेच औद्योगिक सुरक्षा विभागाचे अधिकारी यांचे कारखानदारांशी असलेल्या आर्थिक हितसंबंधांमुळे या औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे ऑडीटची तपासणी न होणे, दुर्घटनेनंतर संबंधित कारखान्यांना बंदची नोटीस देऊन कारवाई न करणे यामुळे सदर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमध्ये असे प्रकार वारंवार घडून कामगारांचे मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंपनी व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणेसह मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांस तातडीने आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अशंत: खरे आहे.

ॲक्विला ऑरगॅनिक्स प्रा.लि, लोटे परशुराम, ता. खेड, जि. रत्नागिरी. या कारखान्यात दिनांक १८/०५/२०२५ रोजी लागलेल्या आगीच्या घटनेत रिॲक्टरचा स्फोट झालेला नसून रिॲक्टरच्या साफसफाईचे काम सुरू असताना वेल्डिंग स्पार्कच्या संपर्कात येऊन रिॲक्टरच्या आजुबाजुला आग पसरली. सदर घटनेमध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला व एका जखमी कामगारास उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.
(२) सदरच्या कारखान्यात नवीन उपकरणे बसवण्याचे काम सुरु होते. कारखान्यात अद्याप उत्पादन प्रक्रिया सुरु करण्यात आली नव्हती. तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कारखान्यास परवाना देण्यात आलेला नाही.
(३) हे खरे नाही.

या औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांची केंद्रीय निरिक्षण प्रणालीअंतर्गत वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परिक्षण) सुधारणा नियम, २०२४ अन्वये कारखान्यांमध्ये सुरक्षा लेखापरिक्षण करण्यात येते.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडून कारखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) सदर प्रकरणी चौकशी करुन आढळलेल्या भंगाबाबत कारखाना भोगवटादारा विरुध्द प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, खेड, जि. रत्नागिरी यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगाराच्या वारसांना रुपये ६० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

तसेच मृत कामगार हा "युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि." या विमा योजने अंतर्गत नोंदणीकृत असून त्याच्या नुकसान भरपाईबाबत दावा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेतील जखमी कामगाराचा औषधोपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आला असून रजा काळातील पूर्ण वेतन अदा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमांतर्गत रुग्णवाहिकांसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३१) * ७२६९ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर**

**कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गर्भवतीच्या सुविधेसाठी राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा हा उपक्रम राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या राज्यामध्ये १०२ क्रमांकाच्या तीन हजारांहून अधिक रुग्णवाहिका असून जिल्हयाच्या आकारमानानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये कमी अधिक प्रमाणात १०२ रुग्णवाहिका शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णवाहिकांच्या इंधन व दुरुस्तीसाठी मिळत असलेला निधी केंद्र शासनाकडून काही महिन्यांपासून मिळत नसल्याने स्थानिक प्रशासनास उसनवारीवर रुग्णवाहिकेमध्ये इंधन भरावे लागत असून अनेक ठिकाणी पेट्रोलच्या देयकांचा खर्चही काही लाखांपर्यंत पोहचला असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणेकरिता रुग्णवाहिका सेवांसाठी नियमित निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सध्या राज्यामध्ये ३३३२ शासकीय रुग्णवाहिका सर्व ३४ जिल्हयात कार्यान्वित आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

उपसंचालक (परिवहन) आरोग्य सेवा, पुणे यांच्यामार्फत रुग्णवाहिकांची दुरुस्तीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून नियमित अनुदान उपलब्ध असुन, निधीअभावी राज्यात कोणतीही रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद नाही.राज्यातील सर्व जिल्ह्यांना जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना मोफत पिक अप व ड्रॉप बॅक संदर्भ सेवा देण्यासाठी केंद्रशासनाच्या मान्यतेनुसार प्रत्येक वर्षी POL साठी निधी दिला जातो. सन २०२५-२६ चा निधी जिल्हयांच्या मागणीनुसार इंधना करता दि. २३.०४.२०२५ रोजी वितरित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावर सदर निधीचा विनियोग POL साठी करण्यात येतो.

(४) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होणेकरिता केंद्रशासनाच्या मान्यतेनुसार प्रत्येक वर्षी जेएसएसके लाभार्थ्यांना रुग्णवाहिका सेवा देण्यासाठी रुग्णवाहीकेच्या POL चा निधी दिला जातो. केंद्र शासनामार्फत दरवर्षी मंजूर पीआयपीद्वारे प्राप्त होणारा निधी प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हानिहाय वर्ग करण्यात येतो.

उपरोक्त प्रमाणे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर PIP नुसार जेएसएसके लाभार्थ्यांना रुग्णवाहिका सेवा देण्यासाठी रुग्णवाहीकेच्या POL चा निधी जिल्ह्यांना दि. २३.०४.२०२५ रोजी वितरित करण्याची कार्यवाही केली असून, जिल्हास्तरावर शासकीय रुग्णवाहिकेद्वारे जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना मोफत पिक अप व ड्रॉप बॅक संदर्भ सेवा देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) महामार्गावरील एमआयडीसीतील सेंट्रल इंडस्ट्रीज कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३२) * ७३६८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) महामार्गावरील एमआयडीसीमधील सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकोट रोड एमआयडीसीत सन २०१८ पासून ३० ते ३५ कारखान्यांना आगी लागून कोटयवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांमध्ये आग प्रतिरोधक आणि अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अभाव असून याकडे संबंधित विभागामार्फत नियमित पाहणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंपनी व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासह मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांस तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भविष्यात अशा आगीच्या घटना रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल निर्मिती करणाऱ्या कारखान्याला दि.१८.०५.२०२५ रोजी लागलेल्या आगीत कारखान्याचे भोगवटादार व त्यांचे ०३ कुटुंबीय आणि चार कामगार अशा एकूण ०८ जणांचा मृत्यू झाला आहे.

तसेच सन २०१८ पासून अक्कलकोट एमआयडीसीमध्ये एकूण ३३ आगीच्या घटनांमध्ये कारखान्यांचे जवळपास रु.८६.८५ कोटीचे नुकसान झाले आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम-३ नुसार कारखान्यातील आग प्रतिबंधात्मक उपाययोजना सुस्थितीत ठेवण्याची कायदेशीर जबाबदारी कारखान्याचे भोगवटादार यांची आहे. अग्निसुरक्षा अधिनियमाप्रमाणे नियुक्त केलेल्या लायसन्स एजन्सीमार्फत सदर आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तपासणी करण्यात आली असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून, व्यवस्थापनाने केलेल्या भंगाबाबत कारखान्याचे भोगवटादार यांच्याविरुध्द मा. न्यायदंडाधिकारी, सोलापूर यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

अपघातात मृत झालेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत मा. नुकसान भरपाई आयुक्त, सोलापूर यांना कळविले आहे. तसेच आगीच्या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ०५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटना पुनश्च: घडू नयेत म्हणून सोलापूर येथील औद्योगिक (एमआयडीसी) क्षेत्रातील कारखान्यांची तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात बांधकाम पूर्ण झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे कार्यान्वित करणेबाबत

**(३३) * ७२३९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२१ ते सन २०२५ या कालावधीत ४१६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत त्यातील २१३ केंद्र अद्याप सुरू झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रांना आवश्यक असलेले फर्निचर, वीज जोडणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, काही ठिकाणी उद्घाटन कोण करणार असे प्रश्न निर्माण होणे तसेच आरोग्य कर्मचारी नेमण्यासाठी निधी देण्यात येत नसणे इ.कारणास्तव सदर आरोग्य केंद्र अद्याप सुरू करण्यात आली नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना मूलभूत सुविधांसाठी तत्काळ निधी वितरित करुन सदर विनावापर असलेली आरोग्य केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशतः खरे आहे,

सद्यःस्थितीत बांधकाम पूर्ण करण्यात आलेल्या २१३ उपकेंद्रांपैकी २०६ आरोग्य केंद्र कार्यान्वित झालेली आहेत. उर्वरित आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

२०६ आरोग्य उपकेंद्रात आरोग्य सेवा सुरु करण्यात आली असुन उर्वरित ०७ आरोग्य उपकेंद्रातील फ़र्निचर व वीज जोडणीचे काम अंतिम टप्प्यात असुन लवकरच सदरहू आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्यात येतील.

तसेच सदरहू आरोग्य उपकेंद्रांत आरोग्य विषयक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनामध्ये सादर करण्यात आलेला आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## खडवली (जि.ठाणे) येथील 'पसायदान विकास संस्था' या अनधिकृत बाल आश्रमावर कारवाई करणेबाबत

**(३४) * ७१८१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडवली (जि.ठाणे) येथील 'पसायदान विकास संस्था' या अनधिकृत बाल आश्रमात २९ बालकांवर अमानुष पद्धतीने शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण व अत्याचार झाले असून शाळेचे संचालक मुलांना विजेचा शॉक देत असल्याचे तसेच काही मुलांची विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपी श्री.बबन शिंदे, त्यांची पत्नी श्रीमती आशा शिंदे, मुलगा श्री.प्रसन्न शिंदे, शिक्षिका श्रीमती दर्शना पंडित आणि कर्मचारी श्री.प्रकाश गुप्ता यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) तसेच, सदर बाल आश्रम चालविणारी संस्था बेकायदेशीर असतानासुद्धा शासनाच्या संबंधित विभागाकडून त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बेकायदेशीर आश्रमांचा सर्व्हे करून त्यांच्यावर कारवाई करणेसह सदर बाल आश्रमातील पिडीत बालकांचे पुनर्वसन व सुरक्षिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उक्त संस्था, संस्थाचालक तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकारी /कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे : (**१) होय, हे खरे आहे,

(२) होय.

आरोपींवर भा. न्या. स. (बी. एन.एस) २०२३ मधील कलम ६४ (१), ६५ (२), ७४, ११८ (१) ३ (५) बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६ आणि ८ तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ४२, ७५ आणि ८२ (१) नुसार गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही,

खडवली (जि ठाणे) येथिल "पसायदान विकास संस्था" ही अनधिकृत असल्याचे आढळून आल्यानंतर विभागाने याबाबत तात्काळ कार्यवाही करून संबंधितांवर गुन्हे दाखल केलेले आहेत.

(४) ठाणे जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यामध्ये विना परवानगी कोणतेही बालगृह, अनाथाश्रम अथवा वसतिगृह चालविणे अनधिकृत असल्याचे निवेदन प्रसिध्द करुन त्यामध्ये दंडात्मक कारवाई करण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अशा संस्था निदर्शनास आल्यास तात्काळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास संपर्क साधणे बाबत सर्व जनतेला आव्हान करण्यात आलेले आहे.

तसेच राज्यातील बालकांच्या अनधिकृत संस्थाविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत आयुक्त महिला व बाल विकास पुणे यांच्या दि. १६.४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक मुंबई, सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे.

संस्थेमध्ये दाखल असलेल्या २९ बालकांना मुक्त करून तात्काळ बाल कल्याण समिती, ठाणे यांचे समोर हजर करण्यात आले. सदर बालकांचे समुपदेशन करून त्यांना बाल कल्याण समिती, ठाणे यांचे आदेशान्वये काही बालकांना पालकांच्या ताब्यात तर काही बालकांना विभागाच्या मान्यता प्राप्त शासकीय तसेच स्वंयसेवी संस्थांमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरेड (जि.नागपूर) येथील एमआयडीसीमधील कंपनीत झालेल्या स्फोटाबाबत

**(३५) * ७३२५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) येथील एमआयडीसीमधील एम.एम.पी.ॲल्युमिनियम कंपनीत दिनांक ११ एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास झालेल्या स्फोटात ५ कामगारांचा मृत्यू व ३ कामगार गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षांत अशा स्वरुपाच्या विविध घटनांमध्ये एकूण १८ कामगारांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक सुरक्षा नियमांचे पालन न केल्यामुळे अशा प्रकारच्या स्फोटांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अपघातांमध्ये मृत व जखमी कामगारांना भरपाई, वैद्यकीय मदत न केल्यामुळे कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त घटनेच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

एम.एम.पी. इंडस्ट्रिज लिमिटेड, एमआयडीसी उमरेड, जि.नागपूर या कारखान्यात दिनांक ११.०४.२०२५ रोजी झालेल्या स्फोट व आगीच्या घटनेमध्ये एकूण ७ कामगारांचा मृत्यु झाला असून ५ कामगार जखमी झाले आहेत.

(२) व (३) मागील दोन वर्षात नागपूर विभागातील स्फोटके निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्ये स्फोटाच्या एकूण ४ घटना घडल्या असून एकूण २९ कामगारांचा मृत्यू झालेला आहे.

(४) हे खरे नाही.

एम.एम.पी इंडस्ट्रिज लिमिटेड, या कारखान्यातील मृत व जखमी कामगारांना कारखाना व्यवस्थापनाकडून नुकसान भरपाई व सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. याशिवाय जखमी कामगारांना देखील सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. तसेच मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रु. ५ लाख देण्यात आलेले आहेत.

(५) सदर घटनेच्या अनुषंगाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली असून, एम.एम.पी. इंडस्ट्रिज लि. कारखान्यात ॲल्युमिनियम पावडरच्या मिक्सरवर असलेले दोन्ही एअर फिल्टर कार्ट्रिज व्हॉल्व्ह बंद ठेवण्यात आल्याने मिक्सरच्या फीड हॉपरमध्ये बॅक प्रेशर निर्माण होवून ड्रममधील ॲल्युमिनियम पावडर फीड हॉपरमध्ये टाकताना स्पार्क होऊन स्फोट झाला.

या अपघाताच्या अनुषंगाने आढळून आलेल्या कायदेभंगाबाबत कारखान्याचे भोगवटादार यांच्याविरुध्द अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच अशा प्रकारच्या अपघाताची पुनरावृत्ती टाळण्याकरीता कारखाना व्यवस्थापनास उपाययोजना सूचविण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडूक बुद्रुक (ता. मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील गर्भवती महिलेस वेळेवर उपचार न मिळाल्याने झालेला मृत्यू

**(३६) * ७५२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूक बुद्रुक (ता. मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील श्रीमती विधी संदेश सावणेकर या गर्भवती महिलेस प्राथमिक आरोग्य केंद्र, देव्हारे व ग्रामीण रूग्णालय, मंडणगड येथे योग्य उपचार मिळाले नसल्यामुळे सदर महिलेस मंडणगड येथून दापोली उपजिल्हा रूग्णालयात नेण्यासाठी वेळेत रूग्णवाहिका उपलब्ध झाली नसल्याने तीचा वाटेतच मृत्यू झाल्याचे दिनांक १० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडणगड रूग्णालयात १०२ क्रमांकाची रूग्णवाहिका उपलब्ध असताना ती देण्यास नकार देण्यात आल्याने परिणामी खासगी रूग्णवाहिका उपलब्ध होण्यास उशिर झाल्याने सदर महिलेला प्राण गमवावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महिलेवर प्राथमिक आरोग्य केंद्र, देव्हारे व ग्रामीण रूग्णालय, मंडणगड येथे उपचार न होणे तसेच १०२ क्रमांकाची रूग्णवाहिका न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असणा-या संबधितांवर कारवाई करणेसह रुग्णास आरोग्य विषयक उपचार व सोयी-सुविधा वेळेवर उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) ,(२ ) व (३) हे अशंत: खरे आहे.

श्रीमती सावणेकर यांचेवर प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामिण रुग्णालय,मंडणगड येथे वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत प्राथमिक उपचार करण्यात आले. उपचारा दरम्यान रुग्णाची प्रकृती खालावल्याने त्यांना उप जिल्हा रुग्णालय, दापोली येथे पुढील योग्य उपचारासाठी संदर्भीत करण्याकरीता रुग्णवाहीका उपलब्धतेसाठी संपर्क केला असता, १०८ रुग्णवाहिका दुसऱ्या रुग्णास घेऊन उपजिल्हा रुग्णालय, दापोली येथे गेली होती तर १०२ रुग्णवाहिकेचा चालक उपलब्ध न झाल्याने, सर्व प्राथमिक उपचार करुन खाजगी रुग्णवाहिकेव्दारे स्टाफ नर्स समवेत ग्रामिण रुग्णालय, मंडणगड येथून उपजिल्हा रुग्णालय, दापोली येथे संदर्भित करण्यात आले. त्यादरम्यान गर्भवती महिलेचा मृत्यु झालेला आहे.

(४) होय ,

बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त दोषी वाहन चालकावर कारवाई करण्याकरीता ओमसाई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, रत्नागिरी या संस्थेस आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार सदर संस्थेने ग्रामीण रुग्णालय मंडणगड येथील रुग्णवाहिका क्र १०२ वरील वाहनचालकास कामावरुन कमी केले आहे.

गरोदरपणात व प्रसूती दरम्यान द्यावयाच्या सेवांमध्ये गुणवत्तापुर्ण सुधारणा तसेच मातेमधील आजारांचे व मृत्युचे प्रमाण कमी करण्याकरिता संस्था व समाजस्तरावर माता-मृत्यू अन्वेषण करीता शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.२८.०५.२०१० नुसार विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे येथे आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(३७) * ७३३८ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालयातील नुतनीकरण झालेल्या सात शस्त्रक्रियागृहांवर सद्य:स्थितीत सामान्य शस्त्रक्रिया विभागाने दावा केला असून बालरोग शस्त्रक्रिया विभागास एकही अद्ययावत शस्त्रक्रियागृह उपलब्ध नसल्याने या रुग्णालयातील १५० बालकांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवजात बालकांवरील अत्यावश्यक शस्त्रक्रिया सध्या ट्रॉमा विभागाच्या पर्यायी व अपुऱ्या जागेत होत असल्याने जंतुसंसर्गाचे प्रमाण वाढून मृत्यूदर वाढत आहे तसेच दुर्बीण (लॅप्रोस्कोपिक) शस्त्रक्रियाही पूर्णतः बंद असल्यामुळे रुग्णसेवेवर आणि वैद्यकीय शिक्षणावर दूरगामी परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांच्या जन्मजात दोष, बाललैंगिक शोषणामुळे झालेल्या जखमा, अपघात आणि गंभीर कर्करोगासंबंधित शस्त्रक्रिया करण्यासाठी कार्यरत असलेल्या बालरोग शस्त्रक्रिया विभागास पूर्वीप्रमाणे स्वतंत्र शस्त्रक्रियागृह देण्यात येणार आहे काय,

(४) तसेच, सदर रुग्णालयात पुणे जिल्ह्यासह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, बीड, लातूर, सोलापूर, सातारा, या जिल्ह्यांतून उपचारासाठी येणा-या रुग्णांची संख्या मोठी असल्याने या रुग्णालयावर अतिरिक्त भार येत असून बी.जे. महाविद्यालयाचा मूळ उद्देश शिक्षण आणि संशोधन हा साध्य होत नसल्याचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयात बालकांसाठी स्वतंत्र शस्त्रक्रियागृह तसेच प्रलंबित शस्त्रक्रिया तत्काळ पूर्ण करणे, महाविद्यालयाचा मूळ उद्देश साध्य करणे तसेच रुग्णसेवेवर येणारा ताण कमी करून रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील बालरोग शल्यचिकित्साशास्त्र विभागाचे शस्त्रक्रियागृह नुतनीकरणासाठी बंद होते. त्यामुळे तात्पुरती व्यवस्था ट्रॉमा ओटीमध्ये करण्यात आली होती. जिथे दरमहा ४० ते ५० तातडीच्या बाल शस्त्रक्रिया होत होत्या. मात्र, मे

महिन्यात ट्रॉमा ओटीमध्ये पाण्याची गळती झाल्याने ते शस्त्रक्रियागृह बंद करुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्याची दुरुस्ती करण्यात आली. ट्रॉमा ओटीचे निर्जंतुकीकरण करून पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहे. या दरम्यान ४०-५० गुंतागुंतीच्या बाल शस्त्रक्रिया प्रलंबित होत्या, परंतु शस्त्रक्रियागृह सुरू झाल्यानंतर त्या पूर्ण करण्यात आल्या असून सध्या कोणतीही शस्त्रक्रिया प्रलंबित नाही.

(२) नाही.

(३) ससून सर्वोपचार रुग्णालय प्रशासनामार्फत बालरोग शस्त्रक्रिया विभागास स्वतंत्र शस्त्रक्रियागृह उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) नाही.

(५) रुग्णालयात बालकांवरील प्रलंबित शस्त्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र शस्त्रक्रियागृह रुग्णालय प्रशासनामार्फत देण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हा व पालिका रुग्णालयाकरीता खरेदी करण्यात आलेल्या शववाहिकांच्या खरेदी प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३८) * ७३५३ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागाकडून जिल्हा रुग्णालय, पालिका रुग्णालयाकरीता रु.३५ कोटी इतक्या रकमेचा सुमारे १०० नव्या शववाहिका खरेदी निविदा प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन करुन स्पर्धा टाळण्यासाठी नियमबाह्य निविदेला मंजुरी देऊन बाजारभावापेक्षा अधिक दराने शववाहिका खरेदी करण्यात आल्याचे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन शववाहिकांचे वितरण करण्यासंदर्भातला शासन निर्णय जारी झाला नसल्याने गेल्या काही महिन्यांपासून पुण्यातील आरोग्य विभागाच्या परिवहन विभागात सदर शववाहिका विनावापर उभ्या असल्याची बाहेर वाच्यता झाल्यानंतर विभागाने त्या शववाहिका जिल्ह्यात रवाना केल्या परंतु तेथे देखील त्या विनावापर असल्याचे निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील नागरिकांना स्वखर्चाने खासगी वाहनाने मृतदेहाची वाहतूक करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर खरेदी प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाई करणेसह सदर शववाहिकांचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया संपूर्ण विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्पर्धात्मक निविदेद्वारे बाजारभावाच्या दराने खरेदी करण्यात आलेली आहे.तसेच सदर निविदा प्रक्रिया केंद्रीय सतर्कता आयोगाची (CVC) मार्गदर्शन तत्वे आणि महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण यांच्यानुसारच पार पाडण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही .

सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र.प्रशामा-२०२३/प्र.क्र १७१/आरोग्य-४, दिनांक: १२ मार्च २०२५ व १९ मार्च,२०२५ अन्वये शववाहिका वितरणाबाबत शासनाकडून आदेश देण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत उपसंचालक ,आरोग्य सेवा (परिवहन), पुणे या कार्यालयामार्फत ११९ नग शववाहिकांचे हस्तांतर करण्यात आलेले असून उर्वरित १३ नग शववाहिका हस्तांतराचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ग्रामीण भागातील नागरिकांना शववाहिका उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित जिल्हा परिषद/ उपभोक्ता कार्यालय यांची आहे. सदर निविदा प्रक्रीया ही निविदा मसुदा समिती, निविदा मुल्यमापन समिती आणि केंद्रीय खरेदी समिती यांनी वेळोवेळी दिलेल्या समितीच्या निर्णयानुसार पूर्ण करण्यात आलेली आहे. संपूर्ण निविदा प्रक्रिया केंद्रीय सतर्कता आयोगाची (CVC) मार्गदर्शन तत्त्वे,आणि महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण यांच्यानुसारच पारदर्शकपणे पार पाडण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रियेमध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.